वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांवर सरळसेवा प्रवेशाने उमेदवारांची भरती करताना मुलाखतीसाठी जिल्हा आदिवासी विकास अधिकारी यांना बोलावण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक बीसीसी-१०८४/१७७/१६-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ मे १९८४.

पहा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७३-जे, दिनांक २५ मे १९७३.

परिपत्रक:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७३-जे, दिनांक २५ मे १९७३ अन्वये सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील पदांवर सरळसेवा प्रवेशाने भरती करताना ज्या मुलाखती घेतल्या जातात त्यावेळी मागासवर्गीय उमेदवारांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने आणि मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षण आणि इतर सवलती याबाबतच्या शासकीय आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा नाही याची खात्री करण्यासाठी या मुलाखतींच्या वेळी समाज कल्याण अधिकारी (वर्ग-२ पेक्षा कमी दर्जा नसलेले) यांना बोलावणे आवश्यक आहे.

२. आता आदिवासी विकास विभाग हा नवीन विभाग स्थापन करण्यात आला असल्यामुळे जिल्हा स्तरावर आदिवासी विकास अधिकारी नेमण्यात आले आहेत. म्हणून यापुढे वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांकरिता मुलाखती घेताना समाज कल्याण अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हा "प्रकल्प अधिकारी" (वर्ग २ पेक्षा कमी दर्जा नसलेले) यांनासुध्दा मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे अशा सूचना सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत. जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनाही मुलाखतीचे आमंत्रण पत्र पाठविताना ते किमान एक महिना अगोदर पाठविण्यात यावे. जिल्हा आदिवासी विकास अधिकारी यांच्या अनुपस्थितीत घेण्यात आलेल्या मुलाखती किंवा करण्यात आलेल्या नेमणुका या नियमबाह्य ( irregular) समजल्या जातील. ज्या जिल्ह्यांत प्रकल्प अधिकारी नसतील त्या जिल्ह्यात हे आदेश सध्या लागू करण्याची आवश्यकता नाही.

३. वरील आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी अशी विनंती सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ना. ज. मोरे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

(कृ. मा. प.)

घघ-१९७(४,०००-५-८४)

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्य मंत्री यांचे स्वीय सहायक,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*आयुक्त, अनुसूचित जाती/जमाती, नवी दिल्ली,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा आदिवासी विकास अधिकारी,
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.

---

*पत्राने.

---

एच-१९७(४,०००-५-८४)-अ